मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन, सहावा मजला,
नवी मुंबई - ४०० ६१४ .

दिनांक :- 27 मार्च 2002

कार्यालयीन आदेश क्रमांक ८ दिनांक :- १९/३/२००२ .

विषय :- एकात्मिक बाल विकास विभागाचा अहवाल स्वतंत्रपणे निर्गमित करणे बाबत .

एकात्मिक बाल विकास योजनेसाठी शासनाकडुन स्वतंत्ररित्या अनुदान जिल्हा परिषदेस प्राप्त होत असुन त्यातुन स्वतंत्ररित्या योजना राबविण्यात येतात. या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनातर्फे सन २००१ - २००२ पासुन उपमुख्य कार्यकारी अधिकारी वर्ग- १ चे पद स्वतंत्ररित्या निर्माण केलेले असल्याने या विभागाचा अहवाल सन २००१-२००२ चे लेखा परीक्षणापासुन स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात यावा.

महिला बालकल्याण विकास विभाग व एकात्मिक बाल विकास विभाग या दोन्ही विभागास मिळुन कार्यालयीन आदेश क्रमांक ६ दि. ३.१.९७ अन्वये मुळ मंजुर श्रमदिनाच्या [अभिकरण योजना सोडुन] ५ टक्के श्रमदिन मंजुर करण्यात आलेले आहेत. महिला बालकल्याण व एकात्मिक बाल विकास या दोन्ही विभागाचे लेखा परीक्षाकरीता मंजुर असलेल्या ५ टक्के श्रमदिनापैकी प्रत्येकी ५० टक्के या प्रमाणे श्रमदिन विभागुन घेण्यात यावेत.

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, म. रा.,
नवी मुंबई .

प्रत :-
१] उपमुख्य लेखा परीक्षक [वरिष्ठ] स्थानिक निधी लेखा,
मुंबई/पुणे/नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक .
२] उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, --------जिल्हा [सर्व जिल्हे]
३] उपमुख्य लेखा परीक्षक [परास] स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई .
४] अधिक्षक अहवाल/परास.
५] अभिलेखापाल .
६) ओ एल. ओ
७) ओ. मे. 2, 3, 4